स्थायी समितीच्या **मंगळवार दिनांक 30–06–2015** रोजी **सायंकाळी 05–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 9. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |
| 10. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 11. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 12. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 13. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 2. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 3. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 104**:— नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालय, क्षेत्रीय कार्यालय व इतर महत्वाच्या विभागामध्ये असलेली मालमत्ता, इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता एकुण 3 पर्यवेक्षक व 79 सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) कार्यरत असुन कंत्राटाची मुदत दि. 15/06/2015 ला संपुष्टात येत आहे. पुढील दि. 16/06/2015 ते 15/06/2016 पर्यंत एक वर्षाचे कालावधी करीता शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते प्रमाणे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ पुणे (मेस्को) यांना कंत्राटाची मुदतवाढीस मंजुरी व आवश्यकतेनुसार सुरक्षा

रक्षकाचे संख्येत बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याचा प्रश्न तसेच नविन कार्यादेश होईपर्यंत शासनाचे किमान वेतन व भत्ता लागु असलेले सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या भत्ते प्रमाणे कार्यादेशास मुदतवाढ देणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 105</u>:— नागपूर शहरात डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वर्ष २०१५—१६ करीता २४००० लिटर एम.एल. ऑईल निविदा मागवून दरकरार करण्याचा व होणारा एकूण अंदाजीत खर्च रू. ३९,६०,०००/— आय व्यय पद क्र. A44201262202 मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 106</u>:— प्रभाग क्र. ५९—अ अंतर्गत रघूजीनगर व सोमवारी क्वॉर्टर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामस्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.के.मेहता ॲन्ड कंपनी, यांची प्राकलनीय दरापेक्षा ३.२० टक्के अधीक दराची रू. ६०,७८,६३५/— रकमेची सुधारीत दराची निविदा स्विकृत करण्यासह सन २०१५—१६ या आर्थिक वर्षात पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतूद उपलबध करून देण्यास प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 107</u>:— प्रभाग क्र. 51 ब अंतर्गत पुर्व लक्ष्मीनगर येथील पुर्ती बाजार जवळील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के. नगरारे यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 4.94 टक्के अधिक दराची रू. 2495164/— (रूपये चोवीस लक्ष पंच्च्यानव्व हजार एकशे चौसष्ठ) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी रू. 2618425/— लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 108</u>:— प्रभाग क्र. 51 ब अंतर्गत रामदासपेठ व रहाटे कॉलोनी येथील डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एल.सी. गुरूबक्षानी यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 5.04 टक्के अधिक दराची रू. 2473774/— (रूपये चोवीस लक्ष त्रैहत्तर हजार सातशे चौऱ्यात्तर) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी रू. 2593752/— लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 109</u>:— नागपूर महानगरपालिका बाजार मंगळवारी सदर नागपूर सर्वे क्र. 2581 मौजा जरीपटका येथे राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद (एन.एफ.बी.डी.) यांचे 90 % अनुदान व म.न.पा.चे 10 % अनुदान घेवुन म.न.पा. सभागृह ठराव क्र. 284 अन्वये ठोक व घावुक विपणन केंद्र

अत्याधुनिक आरोग्य वर्धक मासोळी मार्केट बांधण्यात आले. सदरहु मार्केट मध्ये 108 ओटे व 4 दुकाने बांधण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे **कलम 332 (ड)** च्या तरतुदिन्वये स्थायी समिती म.न.पा. ठराव क्र. 283 दि. 28/11/2014 अन्वये मान्यता प्रदान करून सदरहु मार्केट येथील 4 दुकाने व 108 ओटे यांचे आवंटन सोबत जोडलेल्या यादीतील 56 मासोळी विक्रेत्यांना दुकानाचे व ओट्याचे येणारे बाजार मुल्य न आकारता बाजार दराप्रमाणे फक्त मासीक दुकान भाडे आकारून सदरहु दुकाने व ओटे अकरा महिन्याच्या कालावधीकरीता देणेचे व बाजाराची सुस्थिती व साफसफाई करीता स्वतंत्र निविदा प्रशासनाला काढणेचे सुचविले. सदरहु ठरावाची अंमलबजावणी होणे हेतु संबंधीत 56 मासोळी विक्रेत्यांना ओटे व दुकानांचे ईश्वर चिठ्ठी काढुण आवंटन करणेची प्रक्रिया राबविणेचा बाजार विभागानी दोनदा प्रयत्न केला असता, नागपूर शहरातील मासोळी विक्रेत्यांच्या तिनीही संघटनांनी विरोध करून आवंटन प्रक्रिया बंद पाडली.

संबंधीत तिनीही मासोळी विक्रेता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. चर्चेत त्यांनी बाजार विभागास यादी सादर करून असे सुचविले कि, मंगळवारी मासोळी बाजार व सेंट्रल एवेन्यु रोड वरील मासोळी बाजारात वर्षानुवर्षे पासुन व्यवसाय करीत असलेल्या सर्व मासोळी विक्रेत्यांना मंगळवारी बाजार सदर येथे बांधण्यात आलेल्या ठोक व घाऊक विपणन केंद्र अत्याधुनिक आरोग्य वर्धक मासोळी मार्केट येथे ओटे व दुकाने आवंटीत करण्यात यावी. संबंधीतांचा सुचने नुसार संबंधीतांना वर्षानुवर्षे पासुन मासोळी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायीकांची यादी सादर करणेचे निर्देश दिले.

संबंधीतांनी मंगळवारी मासोळी बाजार व सेंट्रल एवेन्यु रोड येथे मासोळी विक्री करणाऱ्या 104 विक्रेत्यांची यादी सादर केली. व सदरहु यादीतील नावाची चौकशी होणे हेतु बाजार विभागाचे प्रतिनिधी व मासोळी विक्रेता संघटनेच्या पदाधिकारी यांनी संयुक्त मौका चौकशी केली. व संयुक्त चौकशी अंती अंतीम यादी तयार करण्यात आली. सदरहु यादी धारीकेच्या उजव्या बाजुस पृष्ठ क्र. 245 वर टांचण आहे.

सदरहु यादीतील 104 मासोळी विक्रेत्यांना मंगळवारी बाजार, सदर, नागपूर सर्वे क्र. 2581 मौजा जरिपटका येथे बांधण्यात आलेल्या ठोक व घाऊक विपणन केंद्र अत्याधुनिक आरोग्य वर्धक मासोळी मार्केट येथील 108 ओटे देणे बाबतचा प्रश्न तसेच

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79 (ड) अन्वये महानगरपालिकेच्या मालकीचा जागेचा विनियोग होणे अभिप्रेत आहे. व त्यानुसार संबंधीत बाजारातील दुकानाचे बाजार मुल्य रू. 6,25,110/ प्रती दुकान 12.44 चौमी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रू. 3234/ मासीक, ओट्याचे बाजार मुल्य रू. 1,05,776/ प्रती ओटा 2.105 चौ.मी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रू. 547/ मासीक व 2.69 चौ.मी. क्षेत्रफळाच्या ओट्याकरीता बाजार मुल्य रू. 1,35,173/ व भाडे रू. 699/ मासीक अशा प्रकारे वसुल होणे अपेक्षीत आहे.

परंतु सदरहु बाजार राष्ट्रीय मत्स्यिकी विकास बोर्ड, (एन.एफ.डी.बी.) हैद्राबाद यांचे 90 % अनुदान व म.न.पा. चे 10 % अनुदान घेवुन म.न.पा.चा ठराव क्र. 284 अन्वये बांधण्यात आलेला आहे. म.न.पा. व राष्ट्रीय मत्स्यिकी विकास बोर्ड, (एन.एफ.डी.बी.) हैद्राबाद यांच्यात झालेल्या करारनाम्यानुसार गठीत करण्यात आलेल्या व्यवस्थापन समितीतील सदस्य व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मस्त्योउद्योग विकास महामंडळ मर्यादीत, मुंबई. यांचे प्रतिनिधी श्री. रामदास वासनीक यांनी व्यवस्थापन समितीच्या बैठकीत असे निर्देशीत केले कि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 79

(ड) नुसार येणारे बाजार मुल्य आकारून सदरहु बाजारातील दुकानांचे व ओट्यांचे आवंटन करणे उचित नाही, कारण एवढे बाजार मुल्य मासोळी विक्रेते जमा करू शकणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 332 (अ) अन्वये महानगरपालिका बाजारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा यांचा भोगवटा व वापर करण्याबद्दल स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी ठरविल असे दुकान भाडे, भाडे व फी आकारणेची तरतुद आहे. तसेच कलम 332 (ब) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने उपरोक्त प्रमाणे योग्य असलेले दुकान भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एका वेळी एका वर्षा करीता अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीकरीता मकत्याने देण्याची तरतुद आहे. व कलम 332 (ड) अन्वये अशी सुध्दा तरतुद आहे कि, महानगरपालिकेच्या बाजारातील दुकानांचे, गाळ्यांचे, जागेचे आवंटन हे जाहीर लिलावाने किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगी रित्या विक्रीकरून विनियोग करणे तसेच

उपरोक्त अधिकारान्वये मंगळवारी मासोळी मार्केट येथील 108 ओटे यांचे आवंटन सोबत जोडलेल्या यादीतील मासोळी विक्रेत्यांना ओट्यांचे येणारे बाजार मुल्य न आकारता बाजार दराप्रमाणे येणारे भाडे रू. 699/ मासीक 2.69 चौ.मी. क्षेत्रफळाच्या ओट्याकरीता व भाडे रू. 547/ मासीक 2.105 चौ.मी. क्षेत्रफळाच्या ओट्याकरीता आकारून सदरहु दुकाने व ओटे अकरा महिन्याच्या कालावधीकरीता देण्याबाबत उचित निर्णय घेण्याचा प्रश्न तसेच सदरहु मार्केट मधील 4 दुकानांचा आवंटनाबाबत उचित निर्णय घेण्याचा प्रश्न तसेच म.न.पा. स्थायी समिती ठराव क्र. 283 दि. 28/11/2014 करीता पुनर्विचार करून निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उर्वरीत गाळे वाटप करण्याचे अधिकार अध्यक्ष, स्थायी समिती यांना प्रदान करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 110</u>:— महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (।) अन्वये प्रेताची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी म.न.पा. असून महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी हिन्दु दहन घाटांचे दैनंदिन व्यवस्थापन आरोग्य विभागामार्फत करण्यात येते व त्यामध्ये खालील घाटाचा समावेश आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | अंम्बाझरी दहन घाट | 7) | शांतीनगर दहन घाट |
| 2) | मोक्षधाम दहन घाट | 8) | वैशाली निर्वाण घाट |
| 3) | सहकार नगर दहन घाट | 9) | नारा दहन घाट |
| 4) | मानेवाडा दहन घाट | 10) | नारी दहन घाट |
| 5) | गंगाबाई दहन घाट | 11) | पारडी दहन घाट |
| 6) | दिघोरी दहन घाट | 12) | मानकापूर दहन घाट |

शहरातील खाजगी संस्था, व्यक्ती, कंपनी किंवा स्वयंसेवी संस्था इत्यादि दहन घाटांच्या दैनंदिन व्यवस्थापनाची जबाबदारी घेण्यास तयार असल्यास म.न.पा. ची आर्थिक बचत होवून घाटावर असामाजिक तत्वांना आळा घालण्यास मदत होईल. यास्तव खालील जबाबदाऱ्या देण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

1. दहन सामुग्रीचा पूरवठा करणे (उदा. लाकडे, गोवऱ्या, डिझेल, एलपीजी)

2. दहन घाटावर स्वच्छता ठेवणे.
3. दहन घाटावरील किरकोळ कामे/दुरूस्ती करणे.
4. दहन घाटावर सुरक्षा उपलबध करून देणे.
5. दहन घाटावर इतर सोई किंवा सुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी

तरी उपरोक्त प्रमाणे धोरणात्मक निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन धोरणात्मक बाब असल्यामुळे म.न.पा. सभागृहाची मान्यते करीता पाठविण्याची शिफारस करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 111**:— गांधीसागर तलावात 3 वर्ष कालावधीकरीता मस्यव्यवसाय करण्याचा कंत्राट देण्याकरीता प्राप्त निविदापैकी उच्चत्तम निविदाकार मे. बालाजी सर्व्हिसेस् यांनी हा कंत्राट घेण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे व्दितीय निविदाकार मे. दुर्गा करणूके यांनी उच्चत्तम निविदा दरावर रूपये 31,99,999/— ला हे काम घेण्यास तयारी दर्शविल्यामुळे मे. बालाजी सर्व्हिसेस यांची अनामत रक्कम रू. 25,000/— जप्त करण्यास व हा कंत्राट मे. दुर्गा करणूके यांना रूपये 31,99,999/— यांना देण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 112** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर